N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** बार्शी शहर
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0338 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/04/2024 23:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 08/04/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/04/2024
      **Time From (वेळेपासून):** 14:53 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 18:03 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 08/04/2024 **Time (वेळ):** 23:45 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 051
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/04/2024 23:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** जुने पोलीस स्टेशन बार्शी , पंचायत समिती बार्शी

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती स्नेहल भगवान धोळवे

(b) **Father's/Husband's Name** (वडील / पती चे नाव):

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा बार्शी, जि सोलापूर, ,बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा बार्शी, जि सोलापूर, ,बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अविनाश देसाई अंकुश | | | 1. रा स्वरूपानंद नगर, वैराग, ता, बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 2 | बाबासाहेब सुभाष माने | | | 1. राशिवाजी नगर, वैराग, ताबार्श, बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |
| 3 | निखिल दत्तात्रय मांजरे | | | 1. रामुपो देवगाव, ताबार्शी, ज, बार्शी शहर,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10. **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि.08.04.2024

मी श्रीमती स्नेहल भगवान घोळवे, वय-30 वर्षे, व्यवसाय- नोकरी पद- आरोग्य सेविका, रा. बार्शी, जि. सोलापूर, मो. नं. 9822065539 समक्ष हजर राहुन फिर्याद देते की,

मी वरील ठिकाणी माझी आई-वडील, बहिण व माझ्या मुलासह राहण्यास असुन प्राथमिक आरोग्य केंद्र वैराग येथे सन 2019 रोजीपासून आरोग्य सेविका म्हणून नोकरी करीत आहे, त्यावर माझ्या कुटूंबाचे उदरनिर्वाह चालते. माझे वैद्यकीय बिलाचे मंजुरीकरीता माझ्याकडे लाचेची मागणी होत असल्याने मी आजरोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर या कार्यालयास संपर्क साधून पोनि कोळी यांच्याकडे माझी तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि कोळी, अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर यांनी मला सुमारे 14.00 वा. चे सुमारास बार्शी शहराच्या पुढे बार्शी-कुर्डूवाडी रोडवरील जैन मंदिराजवळ येऊन थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सदरठिकाणी जाऊन थांबले असता काहीवेळाने पोनि कोळी हे शासकीय वाहनातून त्यांचा स्टाफ व एक महिला व एक पुरूष शासकीय पंच यांच्यासह येऊन माझी भेट घेतली. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला शासकीय वाहनात बोलावून घेऊन दोन्ही पंचांची व माझी आपसात ओळख करून दिली. त्यावेळी पोनि कोळी यांनी मला माझी तक्रार विचारली असता, माझे पती, माझी आई व माझे वैद्यकीय बिलाचे रक्कम मिळणेकरीता मी प्रस्ताव सादर केला असून बिलाचे काम करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वैराग येथील लिपिक अविनाश देसाई अंकुश यांनी सहायक लेखाधिकारी बाबासाहेब माने यांच्यानावे माझ्याकडे 3000/- रू लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे मी बाबासाहेब माने यांना फोन करून माझे बिलाच्या कामासंदर्भात बोलेल असता त्यांनी माझ्याकडे तिन्ही बिलाकरीता प्रत्येकी 1000/- रू प्रमाणे 3000/- रू मागणी करीत असल्याचे तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रार वाचून पोनि कोळी व पंचानी त्यावर सह्या केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि कोळी यांनी मला लिपिक अविनाश देसाई अंकुश यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, माझे अविनाश देसाई अंकुश यांच्याशी बोलणे झाले असून त्यांनी मला जुने पोलीस स्टेशन जवळील आयसीआयसीआय बँकेजवळ बोलावले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर लिपिक अविनाश देसाई अंकुश याची पडताळणी करण्यासाठी महिला पंच क्र.01 व मला योग्य त्या सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते महिला पंच क्र. 01 यांच्याकरवी माझ्या गळ्यात अडकावून माझ्याकडील स्कूटरवरून रवाना केले. महिला पंच व मी असे दोघे आयसीआयसीआय बँकेजवळ गेलो असता अंकुश यांनी आम्हाला हाताच्या इशा-याने बँकेच्या विरूध्द दिशेस थोडे बाजूस अंतरावर असलेल्या लस्सी व ज्युसच्या दुकानाजवळ बोलावले. त्याठिकाणी आम्ही भेटून माझ्या मेडिकल बिलाचे कामाविषयी चर्चा करत असताना लिपिक अविनाश देसाई अंकुश यांनी मेडिकल बिलाचे काम करण्यासाठी पंचायत समितीमधील माने भाऊसाहेबांना 2000/- रू देण्यास सांगितले त्यावेळी मी लाच रकमेमध्ये तडजोड केली असता त्यांनी मला तीन वरून दोनवर आणलय असे सांगुन 2000/- रू देण्यास सांगितले. त्याचवेळी लिपिक अविनाश देसाई अंकुश यांनी बाबासाहेब माने यांना फोन करून मला त्यांच्याकडे पाठवत असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी मला पंचायत समितीमध्ये जाऊन माने यांना भेटून त्यांच्याकडे 2000/- रू देण्यास सांगितले. त्यावेळी मी जैन मंदिराजवळ थांबलेल्या पोनि कोळी यांच्याकडे जाऊन घडलेली हकीकत सांगितली. त्यावेळी पोनि

कोळी यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची खात्री केली. सदर रेकॉर्डींगमध्ये पडताळणीवेळी लिपिक अविनाश देसाई अंकुश यांनी माझ्याकडे 2000/- रू. लाचेची मागणी करून ते पचायत समितीमधील बाबासाहेब माने यांच्याकडे देण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले.त्यामुळे पोनि कोळी यांनी बाबासाहेब माने यांची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने त्यांची भेट कोठे होईल याची विचारणा करण्यासाठी मला त्यांचे मोबाईलवर फोन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी बाबासाहेब माने यांना माझ्या मोबाईलवर फोन करून कोठे भेट होईल याबाबत विचारले असता त्यांनी मला पंचायत समितीमध्ये येण्यास सांगितले.सदरचे संभाषण पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डींगद्वारे रेकॉर्ड करून घेतले. त्यावेळी मी बाबासाहेब माने यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांना लागलीच जास्त वेळ न घालवता लाचे रक्कम दिली नाही तर त्यांना शंका येऊन ते लाच स्विकारण्याची शक्यता कमी आहे, त्यामुळे मी पोनि कोळी यांनी पंचायत समिती कार्यालयाचे जवळील जगदाळे मामा हॉस्पीटल जवळ थांबण्याची विनंती केली. त्याप्रमाणे पोनि कोळी, सापळा पथकासह जगदाळे मामा हॉस्पीटल जवळ येऊन थांबले. त्याठिकाणी पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डींग चालू करून ते महिला पंचाकरवी माझ्या गळ्यात अडकावून मला व पंच क्र.01 यांना पंचायत समिती कार्यालयाकडे रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही सदर ठिकाणी जाऊन बाबासाहेब माने यांना फोन केले असता त्यांनी अर्थ विभागाकडे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही माने यांची भेट घेतली आणि अंकुश भाऊसाहेब यांनी भेटण्यास सांगितले आहे असे सांगितले असता त्यांनी मला घोळवे का असे विचारले. त्यावेळी मी अंकुश भाऊसाहेब 2000/- रू म्हणतात 1000/- रू. कमी करा, 2000/- रू. जास्त होतय असे म्हणाले असता त्यांनी मला तेवढ तर करायला लागत्यात असे म्हणाले त्यावेळी मी 2000/- रू का असे विचारले असता त्यांनी हो म्हणून लाच रकमेची मागणी केली.तेव्हा मी दोन मिनिटात घेऊन येते असे सांगुन जगदाळे मामा चौकात थांबलेल्या पोनि कोळी यांची भेट घेतली आणि झालेली हकिकत सांगितली.त्यावेळी पोनि कोळी यांनी व्हॉईसरेकॉर्डींगमध्ये झालेले संभाषण फॉरवर्ड करून ऐकले.सदरवेळी बाबासाहेब माने यांनी 2000/- रू लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पोनि कोळी यांनी बाबासाहेब माने यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून मी हजर केलेली लाच रक्कम 2000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा महिला पंच यांचेहस्ते माझ्या टॉपच्या उजव्या बाजूच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी बाबासाहेब माने यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते महिला पंचाकरवी माझ्या गळयात अडकावून मला, व पंच क्र. 1 यांना माझ्या स्कूटरवरून पंचायत समिती बार्शी येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि कोळी, पंच 02 आणि इतर सापळा पथक असे शासकीय वाहनातुन आमच्या पाठीमागे आले. मी व पंच नं.1 असे पंचायत समिती बार्शी या कार्यालयात गेलो त्यावेळी पोनि कोळी व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी व पंच दोघे अर्थ विभागाच्या कार्यालयात जाऊन बाबासाहेब माने यांच्या कार्यालयात गेलो असता त्यांनी अंकुशकडे करा इतकेच बोलून लाचेची रक्कम अविनाश देसाई अंकुश यांच्याकडे देण्यास सांगितले त्यामुळे मी व पंच दोघे माझ्या स्कूटरवरून पुन्हा जगदाळे मामा चौकात जाऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या मोकळ्या मैदानात थांबलो. आमच्या पाठीमागे सापळा पथक येऊन माझी भेट घेतली. सापळाकारवाईवेळी बाबासाहेब माने यांनी लाचेची रक्कम अंकुशकडे द्या असे सांगितले असल्याचे मी पोनि कोळी यांना सांगितले असता त्यांनी मला लिपिक अंकुश यांना फोन करण्यास सांगितले परंतु त्यांचा फोन बंद आढळून आला. त्यामुळे आम्ही काहीवेळ थांबून पंचायत समिती कार्यालयात जाऊन बाबासाहेब माने यांची भेट घेऊन अंकुश भाऊसाहेबांचा फोन लागत नाही असे सांगण्याचे ठरले.त्याप्रमाणे काहीवेळाने पुन्हा माझ्या गळ्यात व्हॉईसरेकॉर्डींग अडकावून मला व पंचास पंचायत समिती कार्यालयाकडे रवाना केले.आमच्या पाठोपाठ पोनि कोळी व सापळा पथक येऊन त्या परिसरात सापळा लावून थांबले. त्यावेळी मी बाबासाहेब माने यांना फोन करून अंकुश भाऊसाहेबांचा कॉल लागत नाही, मला उद्या परत जायचे आहे त्यामुळे गेटवर या असे सांगितले. त्यावेळी काहीवेळाने मला बाबासाहेब माने यांनी फोन करून टोपी घातलेल्या इसमाकडे देण्यास सांगितले आणि फोन बंद केले. काहीवेळाने माझ्याकडे एक टोपी घातलेला इसम आला त्यास मी तुम्ही कोण आहे असे विचारले असता त्याने मला 2000/- रू द्या की असे सांगितले.तेव्हा मी त्यास तुमच्याकडे सांगितलय का, मानेंनीच पाठविले आहे का असे विचारले असता त्यांनी हो-हो म्हणाले. तेव्हा मी माझ्या टॉपच्या खिशात ठेवलेले 2000/- रू रकमेच्या नोटा काढून त्या इसमाकडे दिले. त्यावेळी त्याने माझ्याकडून लाचेची रक्कम स्वीकारून त्याच्या शर्टाच्या खिशामध्ये ठेवले. त्यावेळी मी केलेल्या नियोजीत इशा-यावरून पंचायत समिती बार्शी या कार्यालयाच्या परिसरात सापळा लावून थांबलेले सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी येवून लाच रक्कम स्वीकारलेल्या इसमास ताब्यात घेतले.तसेच त्यांनंतर अर्थ विभागाच्या कार्यालयासमोर थांबलेले बाबासाहेब माने यांना देखील ताब्यात घेतले. सदरवेळी लिपिक अविनाश देसाई अंकुश यास फोन केला असता त्याचा फोन बंद असल्याचे दिसून आले.

त्यानंतर पोनि कोळी यांनी माने यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव बाबासाहेब सुभाष माने, वय-40 वर्षे, पद- सहायक लेखाधिकारी, पंचायत समिती बार्शी रा. शिवाजी नगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांनी लाच रक्कम स्विकारलेल्या इसमास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव निखिल दत्तात्रय मांजरे, वय- 32 वर्षे, डाटा एन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी), रा. मु.पो देवगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर असे सांगितले. सदर ठिकाणी शासकीय वाहनात लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही शासकीय विश्रामगृह बार्शी येथे पुर्ण करण्यात आले.

तरी दि.08/04/2024 रोजी 14.53 ते 18.03 वा चे दरम्यान लोकसेवक 1) अविनाश देसाई अंकुश, अंदाजे वय- 50 वर्षे, लिपिक, प्राथमिक आरोग्य केंद्र, वैराग रा. स्वरूपानंद नगर, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी आयसीआयसीआय बँकेसमोरील ज्युस दुकान, बार्शी येथे तसेच लोकसेवक 2) बाबासाहेब सुभाष माने, वय-40 वर्षे, पद-सहायक लेखाधिकारी, पंचायत समिती बार्शी, रा.शिवाजी नगर, वैराग, ता.बार्शी, जि.सोलापूर यांनी पंचायत समिती बार्शी येथील अर्थ विभागाचे कार्यालयाचे परिसरात आमचे वैद्यकिय उपचाराकरीता झालेल्या बिलाचे खर्च मिळणेकरीता सादर केलेल्या प्रस्तावावरून वैद्यकिय बिलाचे काम पुर्ण करून बिल अदा करण्यासाठी सुरूवातीस 3000/- रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती 2000/- रू लाच मागणी करून ते इतर लोकसेवक 3) निखिल दत्तात्रय मांजरे, वय-32 वर्षे, डाटा एन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी), पंचायत समिती कार्यालय बार्शी, रा.मु.पो देवगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांच्याकडे देण्यास सांगुन अयोग्यरित्या बेकायदेशीर पारितोषण स्विकारण्याचे प्रयत्न करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे तसेच इतर लोकसेवक 3) यांनी लोकसेवक क्र.1 व 2 यांच्यावतीने लाच स्वीकारून गुन्हांस मदत केल्याने माझी वरील तिघांविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(चंद्रकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ANNASAHEB RAMCHANDRA MANJARE(I (Inspector)) / PCMH25624 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(c) Transferred to P.S.

(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): ANNASAHEB RAMCH

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): PCMH25624